# एमडी ड्रग्ज तस्करीत तिघांना अटक

## विशेष पथकाची कारवाई

## 40.34 ग्रॅम एमडीसह 8 लाख 32 हजाराचा मुद्देमाल जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9)** कारमधून एमडी ड्रग्जची तस्करी करणाऱ्या तिन आरोपींना पोलीस आयुक्तांच्या विशेष पथकाने बडनेरा-अकोला मार्गावरून अटक केली. अब्दुल एजाज अब्दुल अजीम (47, रा. हबीबनगर, अमरावती), शाहरुख खान बिसमिल्ला खान (30, रा. खुर्शीदपुरा, अमरावती) व अविनाश मनोज खांडेकर (28, रा. जुनी वस्ती, बडनेरा) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून 4.34 ग्रॅम एमडी ड्रग्जसह कार, 3 मोबाइल व वजन काटा असा 8 लाख 32 हजार 700 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई 9 एप्रिल रोजी दुपारी 1.30 वाजताच्या सुमारास करण्यात आली.

मुंबईवरून एका कारमधून अमरावतीला विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्ज आणण्यात येत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या विशेष पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर विशेष पथकाने बडनेरा-अकोला मार्गावर सापळा रचून संशयास्पद कार क्रमांक एमएच 27 बीझेड 2011 अडविली. त्यावेळी कारमध्ये अब्दुल एजाज, शाहरुख खान व अविनाश हे तिघे बसून होते. विशेष पथकाने कारची झडती घेतल्यावर त्यात 40.34 ग्रॅम एमडी ड्रग्ज आढळून आले. त्यानुसार पथकाने तिघांनाही अटक करून त्यांच्याकडून एमडी ड्रग्ज, कार, 3 मोबाइल व वजन काटा असा एकूण 8 लाख 2 हजार 700 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरुद्ध बडनेरा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई विशेष पथकाचे पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले, साहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश इंगळे, पोलीस उपनिरीक्षक तुषार गावंडे, युसूफ सौदागर, छोटेलाल यादव, रणजित गावंडे, निखिल माहुरे, आशिष डवले, निवृत्ती काकड, संजय भारसाकडे, अमोल मनोहर, नईम बेग, गजानन सातंगे यांनी केली.

# अचलपूर तालुक्यात अवकाळी पावसाची हजेरी

## वादळी पावसाने गहु, हरभरा, फळ पिकाचे नुकसान

### अचलपुरात टिन पत्रे उडाली



रब्बी हंगामात 2 एकर क्षेत्रावर ज्वारी पिकाची लागवड केली होती, काल-परवा मळणी करून ज्वारीचे ठिग लावले होते, आज सायंकाळी आलेल्या पावसाने संपूर्ण ज्वारीचे गंजी भिजली असून यामुळे ज्वारी काढणीस विलंब, कोंब येऊ शकते तसेच काळे होण्याची शक्यता आहे .

**मनिष बहादुरे,**
**ज्वारी उत्पादक अचलपुर**

**टिन उडाले, सुदैवाने मुले बचावली**

अचलपूर परतवाडा सह तालुक्यात बऱ्याच भागात अवकाळी पाऊस कोसळला. यात अचलपूर शहरातील सराईपुरा बेगमपुरा भागात टिन पत्र उडाली होती. श्री राम मंदिर बेगमपुरा भागातील मैदानात लहान मुले क्रिकेट खेळत असताना कुठून तरी टिन उड्न मैदानात पडलाय मुलांनी वेळेत तिथून पळ काढल्याने अनर्थ टळला.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.9)** बुधवारी सायंकाळी जिल्ह्यातील काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने शेती पिकांचे नुकसान केले. अचलपूर शहरासह तालुक्यात वादळी वाऱ्या सह पाऊस कोसळला. परतवाडा अचलपुर शहरातील काही भागातील विज ही गुल झाली होती. अवकाळी पावसामुळे काढणीस आलेला ग गहु हरभरा फळ पिकाचे वादळी वाऱ्याने नुकसान झाले. शेतकरी वर्गात चिंता निर्माण झाली आहे. शहरातील काही भागात टिन पत्रे उडाल्याची माहिती मिळाली आहे .

हवामान विभागाने एप्रील 8 व 9 रोजी तापमान प्रचंड वाढणार असल्याने अवकाळी पाऊस येऊ शकतो असा अंदाज वर्तवला होता. तो खरा ठरला असून, 9 एप्रिल रोजी अमरावती जिल्ह्यातील काही ठिकाणी वादळी वार्यासह पाऊस पडला. यामध्ये अचलपुर परतवाडा शहरासह तालुकयात अवकाळी पावसाने चांगलेच झोडपून काढले. दुपारी 3 वाजतापासूनच ढगाळ वातावरण तयार होते. सायंकाळी 6 वाजता वादळी वाऱ्या सह पावसाला सुरुवात झाली होती. तालुक्यातील बहुतांश ठिकाणी पावसाच्या सरी आल्यात दुपारी 4 ते 5 वाजता दरम्यान उन्ह पडले व सायंकाळी बऱ्या च भागात पाऊस सुरू झाला.

अवकाळी पावसाने मात्र शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे . गहू हरभरा काढणीच्या अवस्थेत आहे अवकाळी पावसामुळे या पिकावर विपरीत होऊ शकतो. त्यामुळे हे वातावरण लवकर निवडले पाहिजे अन्यथा हाती आलेल पिक जाऊ शकते.

# शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांचा पुण्यतिथी महोत्सव आज

## पुष्पांजली, मानवंदना व 'भारतीय संविधान : डॉ.पंजाबराव देशमुख पुस्तकाचे प्रकाशन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9)** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 60 व्या पुण्यतिथीनिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे पुण्यतिथी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून गुरुवार दि. 10 एप्रिलला सकाळी 9 वाजता स्मृतीकेंद्र येथील भाऊसाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पांजली व आदरांजली अर्पण करण्यात येईल तर पुण्यतिथीचा मुख्य कार्यक्रम डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात सकाळी 10.30 वाजता होईल.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात आयोजित कार्यक्रमाला महाराष्ट्राचे महसूलमंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून महाराष्ट्राचे गृह(ग्रामीण) वशालेय शिक्षण राज्यमंत्री ना.डॉ.पंकज भोयर, राज्यसभा सदस्य खा.अनिल बोंडे, अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे व अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांची प्रमुख उपस्थिती राहील.याकार्यक्रमात श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा प्रकाशित 'भारतीय संविधान : डॉ.पंजाबराव देशमुख' यापुस्तकाचे प्रकाशन करण्यात येईल. आदरांजली व मुख्य कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष सर्व ॲड गजाननराव पुंडकर, ॲड. जे.व्ही.उपाख्य भैय्यासाहेब पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य सर्व हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, नरेशचंद्र पाटील, डॉ.पुरुषोत्तम वायाळ व डॉ.अमोल महल्ले प्रामुख्याने उपस्थित राहतील. पुष्पांजली व आदरांजली कार्यक्रमाला तसेच मुख्य कार्यक्रमालासर्व अमरावतीकर नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे यांनी केले आहे.

# त्या रिल्स स्टारवर पोलिसांची कारवाई

## भर रस्त्यात सिग्नलवर रिल्ससाठी बनवला होता व्हिडिओ



**महासागीर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9)-** भर रस्त्यात पंचवटी चौकात सोशल मिडियावर रिल्स तयार करणे एका सोशल मिडिया क्रियेटरला महागात पडले आहे.पोलिसांनी देविदास इंगोले याला ताब्यात घेतले आहे. हा व्हिडीओ तयार करतांना सिग्नलवर वाहतुक पोलिस होते किंवा नव्हते याची देखील चौकशी सुरू करण्यात आली आहे.

रिल्स बनवून तो व्हिडिओ सोशल मीडियावर टाकण्याचा सर्वांनाच मोह असतो. मात्र, हे सगळं करताना कोणाला त्रास होणार नाही व स्वत:चा जीव देखील धोक्यात जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असते. अमरावती शहरात मंगळवारी (दि.8) दुपारी भर उन्हात देविदास इंगोले या व्यक्तीने एका महिलेच्या मदतीने अमरावती शहरातील पंचवटी व राजकमल चौकात रिल्स तयार करण्यासाठी धुमाकूळ घातल्याचे बघायला मिळाले. भर रस्त्यात रिल्ससाठी व्हिडिओ बनवला. यावेळी दोन्ही बाजूने ट्राफिक सिग्नल असताना दोन रिल्सस्टार बेधडकपणे खुलेआम नाचत होते. यावेळी त्यांच्या जवळून गाड्या जात होत्या, तरी देखील ते दोघे हटले नाही. सोशल मिडियावरील लाईकच्या नादात जीव धोक्यात घालणे योग्य आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनेची दखल पोलिसांनी देखील घेतली आहे.

अमरावती शहराच्या पंचवटी चौकामध्ये ऐन वाहतुकीच्या वेळेस तो काढलेला व्हिडिओ आहे. दोघांनाही स्पष्टीकरणासाठी पोलिस ठाण्यात बोलावले आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी दिली. या प्रकरणात रिल्स तयार करणारा इंगोले याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील कारवाई पोलिस करत आहेत.

# 'फायनान्स'च्या कर्मचाऱ्याला लुटणारे दोघे गजाआड

## 78 हजारांचा मुद्देमाल जप्त, गाडगेनगर पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9)** चाकूचा धाक दाखवून एका फायनान्स कंपनीतील कर्मचाऱ्याजवळील 40 हजार रुपये रोख लुटणाऱ्या दोघांना गाडगेनगर पोलिसांनी अटक केली. शुभम नरेंद्र चौधरी (22) व रोहन राजेंद्र माने (19, दोघेही रा. चिंचफैल, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून तलवार, कत्ता व 5 हजार रुपये रोख जप्त करण्यात आली. ही घटना 4 एप्रिल रोजी सायंकाळी पॅराडाइज कॉलनी परिसरात घडली होती.



एका फायनान्स कंपनीत कार्यरत शिवकुमार शेलामन्नू (44,रा. कर्नाटक, ह. मु. अमरावती) हे आपल्या एका मित्रासमवेत दुचाकीने वलगावरून रिंगरोडने येत होते. मार्गात पॅराडाईज कॉलनी परिसरात दुचाकीवरून आलेल्या तीन लुटारूंनी त्यांना अडविले. त्यांना तलवार व कत्त्याचा धाक दाखवत त्यांच्याकडील 40 हजार हिसकावून लुटारूंनी तेथून पळ काढला होता. सदर घटनेनंतर शिवकुमार यांनी गाडगेनगर ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास आरंभला. तपासादरम्यान, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे शुभम व रोहन या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली. चौकशीत त्यांनी सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी क्रमांक एमएच 27 सीई 5480, तलवार, कत्ता व 5 हजार रुपये रोख असा एकूण 78 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, या गुन्ह्यात सहभागी असलेल्या एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई गाडगेनगरचे ठाणेदार ब्रह्मा गिरी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिनेश दहादोंडे यांच्या मार्गदर्शनात साहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज मानकर, पोलीस उपनिरीक्षक दिनेश सुरपाम, नीलेश जुनघरे, गजानन बरडे, सागर धरमकर, सुशांत प्रधान, मतीन शेख, नितीन कामडी, हितीश वाठोडकर यांनी केली.

# जंगलात आग, वनविभागाची दमछाक

**अमरावती** - भानखेडा रोडवरील छत्री तलाव परिसरातील जंगलात मंगळवारी दुपारी आग लागल्याने खळबळ उडाली होती. वनविभाग कर्मचाऱ्याची आग आटोक्यात आणण्याकरिता चांगलीच दमछाक झाली. या आगीत मोठ्या प्रमाणात जंगलातील नैसर्गिक संपत्ती जळून खाक झाली आहे. ही आग कशी लागली, याबाबत माहिती पुढे आली नाही. या घटनेच्या माहितीवरून वडाळी वनपरीक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे यांच्यासह वनकर्मचाऱ्याचा मोठा ताफा घटनास्थळी पोहोचला होता.

# विमानतळाच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर एमएडीसीच्या अधिकाऱ्यांकडून अंतिम तयारीचा आढावा





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.9)** - 16 एप्रिल 2025 रोजी होणाऱ्या बहुप्रतीक्षित अमरावती विमानतळाच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) च्या उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालिका स्वाती पांडे यांनी आज विमानतळ परिसराला भेट देऊन सुरू असलेल्या तयारीचा सखोल आढावा घेतला.

यावेळी अमरावतीच्या जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह एमएडीसीचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि ग्रामीण पोलीस दलाचे कर्मचारी उपस्थित होते. मुंबईहून अमरावतीसाठी अलायन्स एअरच्या पहिल्या व्यावसायिक विमानाने येणाऱ्या उच्चपदस्थ मान्यवरांच्या आगमनासह, उद्घाटन समारंभाच्या औपचारिक व्यवस्थेचे बारकाईने अवलोकन करणे हा या पाहणी मागील उद्देश होता. शिष्टमंडळाने आगमन प्रोटोकॉल क्षेत्र, सुरक्षा व्यवस्था, मान्यवरांसाठी निश्चित केलेले स्वागत कक्ष आणि सौंदर्यवृद्धी व फुलांच्या सजावटीसाठी निश्चित केलेल्या क्षेत्रांचे जागेवरच मूल्यांकन केले. टर्मिनल इमारतीच्या शहराकडील भागावर विशेष लक्ष देण्यात आले, जिथे अधिकृत कार्यक्रमासाठी एक समारंभाचा मंडप उभारला जात आहे.

उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालिका यांनी विविध विभाग आणि संस्था यांच्यात समन्वय असणे किती महत्त्वाचे आहे यावर जोर दिला, जेणेकरून उद्घाटन समारंभ विदर्भ प्रदेशासाठीच्या या ऐतिहासिक टप्प्याचे महत्त्व आणि उंची दर्शवेल. कार्यक्रमाच्या दिवसाचे प्रोटोकॉल, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सार्वजनिक सहभागाच्या उपायांवरही चर्चा झाली.


# अमरावती महानगरपालिका, अमरावती

**(भांडार विभाग)**

**ई-निविदा सुचना**

जा.क्र./अमनपा/भां.वि./उपा/४५५/२०२५
दि. २७/०३/२०२५

मा. आयुक्त यांच्या वतीने अमरावती महानगरपालिकेतील भांडार विभागामार्फत कार्यालयास लागणारे फॉर्म, पुस्तके, पाकिटे, रजिस्टर छपाई करून पुरवठा करण्याकरीता ई-निविदा प्रणाली द्वारे ऑनलाईन निविदा चे साहित्य निहाय दर मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाना रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत रूपये | कामाची मुदत दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| | मनपा कार्यालयास लागणारे फॉर्म, पुस्तके, पाकिटे, रजिस्टर छपाई करून पुरवठा करणेबाबत (सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे) | ९०,०००/- | ३% सरक्षा रक्कम FD स्वरूपात निविदा मंजूर झाल्यावर द्यावी लागेल. | २% सरक्षा रक्कम देयकातून कपात करण्यात येईल | ५,४००/-+१८ %GST परत न मिळणारी | पुरवठा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसा पर्यंत |

**ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील :-**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्ध | दि. ०९/०४/२०२५ |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरवात दिनांक | दि. ०९/०४/२०२५ रोजी दु. १२.०० वाजे पासून |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि. २४/०४/२०२५ रोजी दु. ०४.०० वाजे पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक (technical) and (financial) | दि. २५/०४/२०२५ रोजी दु. ०४.०० वाजता शक्य झाल्यास |

सुचना :-
शासनाचे अंगीकृत व्यवसाय अंतर्गत नमूद असलेली महामंडळ उपक्रमांनी त्यांनी उतपादित केलेल्या वस्तुसाठी निविदेत सहभाग घेतल्यास त्यांच्यासाठी एकूण खरेदीच्या ३% खरेदी L-1 दराने राखीव ठेवण्यात येईल
ई-निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दि. ०९/०४/२०२५ ला दुपारी १२.०० वाजेपासून पाहता येईल.

**भांडार अधिक्षक**
**महानगरपालिका अमरावती**

**उपायुक्त (२)**
**महानगरपालिका अमरावती**




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# जिल्ह्यातील 1132 गावांमधील भूजलस्तर चिंताजनक

## काही गावात विहिरींसह बोअरवेल खोदण्यावर प्रतिबंध



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.9 )** – विविध माध्यमातून भूजलामधून उपसा झाल्यानंतर पाहीजे त्या प्रमाणात जमिनीतील पाण्याची पातळी भरून न निघाल्याने जिल्ह्यातील 1132 गावांमधील भूजलस्तर चिंताजनक बनला आहे. त्यामूळे या गावांमध्ये विहीरी खोदण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. यामधील काही गावांमध्ये सार्वजनिक विहीरी वगळता वैयक्तीक विहीरी व बोअरवेल खोदण्यावर बंदी घालण्यात आले आहे.

केंद्रीय भूजल प्राधिकरण आणि राज्य भूजल विभाग भूजल पातळी आणि त्याच्या वापरावर आधारित भूजल क्षेत्रांचे वर्गीकरण करतात. जिल्ह्यातील दोन हजार गावांची पाणलोट क्षेत्रनिहाय विभागणी करण्यात आलेली आहे. या गावांमध्ये योजनांच्या विहिरी खोदण्यास मनाई असली तरी सामूहिक विहीर खोदण्यास मनाई नसल्याची माहिती जीएसडीएचे भूवैज्ञानिक यांनी दिली. तसेच ओव्हर-एक्सप्लॉइटेड वर्गवारीतील 472 गावांमध्ये केवळ विहिरीच नव्हे तर बोअरवेलसुद्धा खोदण्यास मनाई आहे. या गावांमध्ये विहीर किंवा बोअरवेल खोदल्यास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा उपविभागीय महसूल अधिकारी यांच्याद्वारा कारवाई प्रस्तावित केल्या जाते. डार्क झोनमधील मोर्शी, वरुड तालुक्यांसह चांदूर बाजार तालुक्यातील काही गावांचा यामध्ये समावेश आहे.

संबंधित क्षेत्रामधील सिंचन विहीरी, विंधन विहिरी, पाणीपुरवठ्याच्या विहिरींची माहिती तहसील व पंचायत समिती कार्यालयाद्वारा घेतली जाते. पर्जन्यमान, भूजलपातळी, मान्सूनपूर्व व मान्सूनपश्चात झालेला पाऊस आदी गावनिहाय पाणलोटक्षेत्राची माहिती सॉफ्टवेअरद्वारे केंद्रीय भूजल प्राधिकरणाकडे पाठविली जाते व पाण्याचा ताळेबंद तयार होतो. स्टेज ऑफ डेव्हलपमेंटनुसार पाणलोट क्षेत्राची वर्गवारी ठरते. जमिनीत उपलब्ध पाण्यानुसार त्या क्षेत्रातील विहिरींची संख्या निश्चित होते.

### अशी आहे वर्गवारी

60 ते 70 टक्केवारी
सेमिक्रिटिकल व्हिलेज

---

70 ते 80
टक्केवारी क्रिटिकल व्हिलेज

---

80 ते 100
टक्केवारी ओव्हर-एक्सप्लॉइटेड

---

### अशी आहे वर्गीकरण

यासाठी भूजल सर्वेक्षण विभागाने स्टेज ऑफ डेव्हलपमेंट जमिनीची चार प्रकारे वर्गवारी निश्चित केली आहे. यामध्ये जिल्ह्यातील 2000 पैकी 813 गावे सेफ झोनमध्ये आहेत, तर सेमिक्रिटिकल, क्रिटिकल, ओव्हर-एक्सप्लॉइटेड वर्गवारीत 1132 गावे आहेत. या गावांमध्ये शासन योजनांच्या विहिरी खोदण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.

### तालुका निहाय विहिरीसाठी प्रतिबंधित गावे

अचलपूर तालुक्यात 167 गावे, अमरावती 79, अंजनगाव सुर्जी 21, भातकुली 27, चांदूर रेल्वे 8, चांदूरबाजार 155, चिखलदरा 64, दर्यापूर 60, धामणगाव 64, धारणी 2, मोर्शी 866, नांदगाव 86, तिवसा 18 व वरूड तालुक्यात 139 गावांमध्ये शासकीय योजनांच्या विहिरी खोदण्यास मनाई आहे.



# सावरखेड व ततारपूर चे पुनर्वसन करा!

## नागरिकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि. 9 )** मौजा सावरखेड व ततारपूर येथील नागरिकांनी सोमवारी (दि.7) जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना निवेदन देऊन पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, वरवाड येथे सर्वांचे पुनर्वसन करून सुविधा उपलब्ध कराव्यात.

निवेदनानुसार या वर्षी 7 जानेवारी रोजी ग्रामसभेत बहुमताने ठराव मंजूर झाला होता. मौजा वरवाड येथे सावरखेड व ततारपूर गावांचे पुनर्वसन करण्याचे ठरविले होते. तो ठराव जिल्हाधिकारी कार्यालयात देखील पाठवण्यात आला. जून 2025 पासून घळभरणी करायची आहे. त्या आधी सावरखेड व ततारपूर या दोन गावांचे पुनर्वसन वरवाड येथे करणे गरजेचे आहे. दोन्ही गावाच्या नागरिकांच्या म्हणण्यानुसार, जर पुनर्वसन झाले नाही तर घळभरणी प्रकल्पात होऊ देणार नाही, कारण घळभरणी केल्यास वित्त व जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे दोन्ही गावांचे पुनर्वसन तत्काळ करावे.

निवेदन देतांना प्रवीण तायडे ,गोपाळ खोब्रागडे, सुखदेव तायडे, महादेव तायडे, मारुती तायडे नितेश पारिसे, बाळू खंडारे, मनीष खोब्रागडे, संजय तायडे, राजकुमार दाभणे, संजय ढोके, देवेंद्र टेंभुर्णे, दिनेश तंतरपाळे, गौतम बर्डे ,सुनीता डाहे ,वैशाली तायडे, ज्योती तायडे ,नीलिमा भटकर, सुमन पारिसे, अनुसया खंडारे, रेखा दाभणे ,नंदा तंतरपाळे, नर्मदा भटकर, शीला बांद्रे, त्रिवेणी मोहोड, चंदा वानखेडे व अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# चांदूर रेल्वे पटवारी कार्यालयात सातबारा चावडी वाचन



**महासागर प्रतिनिधी**

**चादूर रेल्वे ( दि. 9 )** – 100 दिवसीय कृती आराखडा अंतर्गत शनिवारी (दि.5) स्थानिक ग्राम महसूल अधिकारी (तलाठी )कार्यालय चांदुर भाग 1 व चांदुर भाग 2 येथे चांदूर रेल्वे तहसीलदार पूजा मातोडे यांच्या उपस्थितीत चावडी वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने भाग 1 व 2 चे शेतकरी उपस्थित होते. चांदूर रेल्वे शहरातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी )कार्यालय चांदुर भाग 1 व चांदुर भाग 2 च्या वतीने तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली 100 दिवसीय कृती आराखडा अंतर्गत गावातील शेतकरी यांच्या 7/12 चे वाचन करण्यात आले. यावेळी तहसीलदार पूजा मातोडे यांनी उपस्थित शेतकरी यांना संबोधीत केले. कार्यक्रमांचे संचालन पटवारी दिपक चव्हाण तर आभार पटवारी प्रिती बाजड यांनी मानले. या कार्यक्रमाला मंडल अधिकारी निलेश स्थुल सह गावातील शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारत देश सहिष्णु; सर्वधर्म समभाव तोडणाऱ्यांना जागा दाखवेल

## माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांचा विरोधकांवर हल्लाबोल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )** – काही लोक किंवा काही पक्षांना प्रभू श्रीराम तसेच हिंदू धर्म ही आपली जागिरी असल्यासारखे वाटते. मात्र तसे नाही आहे, आम्ही पण हिंदू आहोत आणि सर्वधर्म समभाव आमच्या रक्ता-रक्तात भिनलेला आहे, आम्ही पण पिढ्यांपिढ्या हिंदु सण उत्सव मोठ्या धडाक्यात साजरे करतो. मात्र काही मंडळी धर्माच्या नावावर राजकारण करून आपली राजकीय पोळी शेकून घेत आहे. एखाद वेळी हे ठिक आहे. मात्र देशातील सहिष्णु जनता फार काळ हे सहन करणार नाही, असा सज्जड इशारा माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी विरोधकांना दिला आहे.

श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर तिवसा तालुक्यातील मोझरी येथील जवळपास 700 वर्षे पुरातन श्रीराम मंदिरात ॲड. यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वात रामजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या पुरातन मंदिरावर नेत्रदीपक रोषणाई करण्यात आली होती. शिवाय फटाक्यांची आतषबाजी, रामनामाचा गजर सर्वांचे लक्ष वेधून घेणारा होता. ग्रामस्थ मोठ्या संख्येने या महोत्सवाच सहभागी झाले होते. मंत्रोच्चारात ॲड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण परिसर निनादून गेला होता. शिवाय गावातून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत मोठ्या संख्येने गावकरी सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे मुस्लिम बांधवांनी सुद्धा या महोत्सवाला उपस्थिती दर्शवून सर्वधर्म समभावाच्या भावनेची जपणूक केली. त्यासोबच रामनवमीनिमित्त आयोजित महाप्रसादामध्ये अनेक मुस्लिम बांधव सुद्दा सहभागी झाले होते. हिंदु - मुस्लिम एकात्मता दर्शविणारा हा अनोखा सोहळा रामनवमीच्या निमित्ताने घडूण आला होता.

> आम्ही पिढ्यानपिढ्या श्रीरामाला माननारे आहोत, हा देश सर्वधर्मसमभाव मानणार्यांचा देश आहे. या सर्वधर्मसमभावाला कुणी तडा देत असेल तर या देशातील नागरिक त्यांना कधीही माफ करणार नाहीत. शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सर्वतोपरी आहे, आम्ही कॉंग्रेसचे आहोत आणि हिंदू धर्माचे सुद्धा, कॉंग्रेसची संस्कृती कधीच कुण्या धर्माचा द्वेष करायला शिकवित नाही. राजकारण नसले तरी चालेल मात्र आम्ही सर्वधर्मांचा सन्मान करीत राहू,
>
> **-ॲड. यशोमतीताई ठाकूर, माजी मंत्री, तथा कॉंग्रेस नेत्या.**

# शिवाजी शाळेचे दहा विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

## राष्ट्रीय साधन सह गुणवत्ता परिक्षेत सुयश



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.9 )** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित मोर्शी येथील शिवाजी उच्च माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय साधन सह गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. शाळेतील अनेक विद्यार्थी परिक्षेत उत्तीर्ण झाले असून त्यातील 10 विद्यार्थी या शिष्यवृत्तीस पात्र ठरलेले आहेत. या शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थ्यांना इयत्ता 9 वी पासून 12 वी पर्यंत दरवर्षी 12000 रुपये प्रमाणे 48000 हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. शिष्यवृत्ती करिता पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अर्णवी पंचभैये, राधा फलके, राम बोबडे, नयन भुसारी, रिद्धी उमरकर, प्रियांशी बोरेकर, कृष्णाली शिरभाते, समर्थ जुजाराव, खुशी पचारे, सिद्धार्थ साबु यांचा समावेश आहे. या सर्व पात्र विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी कौतुक केले आहे. तसेच विद्यालयाचे उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर, पर्यवेक्षक उद्धव गिद, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी, राष्ट्रीय साधन सह गुणवत्ता परीक्षा प्रभारी वैशाली देशमुख, पवन भागवत, रोहित चौधरी यांनी अभिनंदन व कौतुक केले. तसेच पुढच्या वर्षी शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांची संख्या कशी वाढेल याकरिता शाळा सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

# येवदा सरपंच पदावर पुन्हा प्रतिभा माकोडे

### अपात्रतेच्या प्रकरणांवर स्थगिती

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.9 )** – येवदा ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदावर परत एकदा मोठा बदल झाला आहे. सरपंच प्रतिभा माकोडे यांना विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार 22 जानेवारी 2025 रोजी सरपंच पदावरून अपात्र घोषित करण्यात आले होते. मात्र उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अपात्र घोषित झाल्यापासून त्यांना तीन आठवड्याची मुदतवाढ मिळाली होती, त्यांची ही मुदत दि. 12 फेब्रुवारीला संपल्याने ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमानुल्ला खा दिलावर खा यांना सरपंच पदाचा प्रभार सोपविन्यात आला होता. त्यानंतर दुसऱ्या प्रकरणात 26 जानेवारीची ग्रामसभा न घेतल्याचा ठपका ठेवत जिल्हाधिकारी यांनी 24 फेब्रुवारीला सरपंच आणि सदस्य पदावरून अपात्र घोषित केले होते. त्यानंतर माकोडे यांनी विभागीय आयुक्तांच्या निर्णयाला मंत्रालयातून दि.7 मार्च रोजी स्थगिती मिळविली व दुसऱ्या प्रकरणात त्यांनी दि.4 एप्रिल रोजी उच्च न्यायालयातून जिल्हाधिकारी यांच्या निर्णयावर सुद्धा स्थगिती मिळविली. दोन्ही निलंबनाच्या आदेशाला स्थगिती मिळाल्याने प्रतिभा माकोडे यांनी दि.7 एप्रिल रोजी सकाळी ग्रामपंचायत येथे येऊन सरपंच पदाचा पुन्हा पदभार सांभाळला. त्यामुळे त्यांच्या समर्थकांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला. ग्रामपंचायतीच्या या बदलांमुळे येवदा गावात मोठी चर्चा रंगली आहे. समर्थक आणि विरोधक दोन्ही गट यावर आपली प्रतिक्रिया देत आहेत. यावेळी कार्यकर्ते राजू मानकर, दीपक कंटाळे, जितू डोके, बाळू चांडोळे व गावकरी मंडळी उपस्थित होते.



# मजीप्राच्या ऑनलाइन सुविधेला ग्राहकांचा थंड प्रतिसाद

## फक्त साडे सहा हजार रुपयांच्या देयकांचाच भरणा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )**– शासकीय यंत्रणाकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा ऑनलाइन व डिजिटल होत असताना, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग अद्यापही याबाबतीत बराच मागे असल्याचे दिसत आहे. मजीप्रा ने मागील दोन वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेसाठी ऑनलाइन व्यवस्था केली असली, तरी ती अन्य यंत्रणांप्रमाणे अद्ययावत नसल्याने ग्राहकांकडून मिळणारा प्रतिसाद अत्यल्प असल्याचे दिसून येत आहे. कराची रक्कम, भरणा करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत असली, तरी हे प्रमाण जास्तीत जास्त 7 टक्केच आहे. महापालिका, महावितरण आदी विभागांच्या ग्राहकांना मालमत्ता कर किंवा वीजदेयकाचा भरणा करण्यासाठी विविध ऑनलाइन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामध्ये क्यूआर कोड, संकेतस्थळाची लिंक, ॲप त्यावरील सवलत आदी सर्व माहिती ऑनलाइन पाहता येते.

महावितरणच्या ॲपवर चालू व मागील वर्षातील वीजदेयकांचीही स्थिती तपासता येते. मजीप्राकडून मात्र केवळ क्यूआर कोडचा ऑनलाइन पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. शिवाय संकेतस्थळावरील लिंकवर गेल्या एका खासगी बँकेच्या माध्यमातून देयकाचा भरणा करण्याची सुविधा असली, तरी त्यावरून देयकाचा भरणा करताना बँकेच्याही सेवाशुल्काचा समावेश केला जातो. त्यामुळे ग्राहकांकडून ऑनलाइन देयकाचा भरणा करण्यासाठी फारसा प्रतिसाद मिळत नसल्याची दिसत आहे. क्युआर कोडद्वारे ऑनलाइन देयकाचा भरणा करता येत असला, तरी त्यामध्ये ग्राहकालाच देयकाची रक्कम टाकावी लागते. त्यामुळे लिंकवर क्लिक करताच किंवा क्यूआर कोड स्कॅन करताना ग्राहकांसाठी ती पद्धत सोपी जावी, यासाठी ही उपलब्ध ऑनलाइन सेवा आणखी अद्ययावत करण्याची गरज ग्राहकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, मजीप्राचे 1 लाख 4 हजार ग्राहक शहरात आहे. त्यातुलनेत डिसेंबर 2024 पर्यंत साडेपाच हजार ग्राहकांनीच ऑनलाइन देयकाचा भरणा केला.

तसेच जानेवारी 2025 मध्ये 5 हजार 619 फेब्रुवारीमध्ये 6 हजार 255, तर मार्च महिन्यात 6 हजार 930 ग्राहकांनी ऑनलाइन पद्धतीने देयकाचा भरणा केला आहे.

त्यामुळे हळूहळू ऑनलाइन भरणा करणाऱ्यांची संख्या वाढत असली, तरी मजीप्राच ऑनलाइन सेवा अद्ययावत करण्याची अपेक्षा ग्राहकांकडून व्यक्त होत आहे. ग्राहकांच्या देयकांवर क्यूआर कोड छापलेला असून, त्याद्वारे देयकाचा भरणा करता येतो; मात्र ही व्यवस्था आणखी अद्ययावत करण्यासाठी व ऑनलाइन पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून प्रयत्न सुरू आहे,असे मजीप्रा उपअभियंता मजीप्रा संजय लेवरकर यांनी सांगीतले.

# मेळघाटात 72 गावांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जनजागृती

## पोटावर डागण्या देणारी अघोरी प्रथा थांबविण्याकरिता प्रयत्न



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )** – आदिवासी बहुल भागात आजार बरे करण्यासाठी पोटावर डागण्या देण्याची अघोरी प्रथा आहे. 21 व्या शतकात देखील अशा प्रथेमुळे होणार्या बालमृत्यूच्या घटना समोर येत आहे. अंधश्रद्धा अज्ञान यातून होणार्या या घटना थांबवण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने मेळघाट येथील 72 गावांमध्ये जनजागृती मोहीम चालवली जात आहे. 17 मार्च पासून ही मोहीम सुरू झाली होती. मोहीमेच्या पहिल्या टप्प्याचा समारोप सोमवारी 7 एप्रिल रोजी झाला, अशी माहिती पत्रकार परिषदेत समितीच्या पदाधिकार्यांनी दिली आहे.

त्यांनी सांगितले की, मेळघाटमधील 72 गावांत त्यांनी जनसंवादाचे एकूण 140 कार्यक्रम घेतले. 20 दिवसात हे कार्यक्रम घेण्यात आले. जिथे जिथे लोकं एकत्र भेटत होते व संधी मिळत होती तिथे तिथे त्यांनी लोकांसोबत जादूटोणा, मांत्रिकाकडे जाण्याबद्दल चर्चा करून त्यांना समजाविले. गावात वीज नसायची ,चौकात सोलरवर लाईट असायचे, त्या लाईटच्या खांब्याखाली रात्रीचे कार्यक्रम घेऊन लोकांशी संवाद साधण्यात आला. त्यांच्यामध्ये जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचा प्रथम टप्पा पूर्ण झालेला आहे. अंगणवाडीतील छोटी मुले, जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक शाळा, आश्रमशाळा या सर्वांसाठी हे कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या आरोग्य, ग्रामविकास, शिक्षण विभागातील कर्मचार्यांचे व शासनाचे सहकार्य मिळाले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे, तसेच तालुका आरोग्य अधिकारी आदित्य पाटील यांनी विशेष सहकार्य केले. बाळाच्या पोटावर डागण्या देण्याची ही घातक अघोरी उपचार प्रथा थांबविणे आवश्यक आहे. त्यासाठी समिती यापुढेही पाठपुरावा करेल अशी माहिती देण्यात आले. पत्रकार परिषदेला नंदिनी जाधव, भगवान रणदिवे, श्रीकृष्ण धोटे आदि उपस्थित होते.

# मासोद गावाला पिण्याच्या पाण्याचा टँकरने पुरवठा

## दुषीत पाण्याने बिघडली होती ग्रामस्थांची प्रकृती ▪ प्रशासन सतर्क, आरोग्य पथक 24 तास गावात



आरोग्य सेवक सह आरोग्य पथक











**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि. 9 )** चांदूरबाजार तालुक्यातील मासोद या गावात पिण्याच्या पाण्यामुळे काही जणांची प्रकृती बिघडल्याचे समोर आल्यानंतर प्रशासनाने याबाबत सतर्कता बाळगल्याचे दिसून येत आहे. घटना समोर आल्यानंतर तात्काळ गावामध्ये जिल्हा प्रशासन पोहचले आणि गावातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत तसेच इतर ठिकाणी आढळून आलेल्या बाबीचा अहवाल तयार केला. पाण्याची तपासणी करून आज बुधवारपासून गावक ?यानां वापरासाठी पाण्याचा सुरळीत पुरवठा करण्यात येत असून पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे याकरिता टँकरने गावाला पाणीपुरवठा केला जात आहे. गावात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आरोग्य विभागाचे पथक 24 तास उपलब्ध आहे. गावक ?यांची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे.

उपचार घेत असलेल्या 15 जणांची प्रकृती देखील चांगली असल्याचे समजते. चांदूरबाजार तालुक्यातील कुठल्याही ग्रामपंचायतमध्ये जलवाहिन्यांना गळती असेल तर लवकरात लवकर ती दुरुस्त करण्याच्या सूचना गटविकास अधिकारी नारायण आमझरे यांनी सर्व ग्रामसेवक यांना पत्राद्वारे दिल्या आहे.

वित्त आयोगमध्ये अनेक ग्रामपंचायतमध्ये घेण्यात आलेले आरो प्लांट हे आज बंद अवस्थेत असून त्या आरोचा उपयोग होत नाही. संबंधित ठेकेदारांनी बोगस आरो प्लांट ग्रामपंचायतमध्ये बसवून घोळ केला असल्याचा आरोप होत आहे. याची वरिष्ठांनी दखल घेण्याची मागणी केली जात आहे. यासंदर्भात आमसभेत आमदार प्रवीण तायडे यांनी देखील प्रश्न उपस्थित केला होता. सर्व आरो प्लांटची माहिती येउन आवश्यक कार्यवाही करणार असल्याचे गटविकास अधिकारी आमझरे यांनी दैनिक महासागर ला सांगितले.

### मद्यपी कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी!

तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायत मधील ग्रामपंचायत मधील पाणी पुरवठा कर्मचारी यांची व त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांची आरोग्य तपासणी गरजेचे आहे. जेणेकरून काही आरोग्य समस्या असल्यास त्याचा त्रास इतराना होणार नाही.तर काही ग्रामपंचायत मधील मद्यपी कर्मचाऱ्यांवर वेळीच कारवाई होणे गरजेचे झाले आहे.



# मुख्य वनसंरक्षक कार्यालयात शेतकऱ्यांचा नुकसान भरपाईसाठी ठिय्या

## वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांत समन्वय नसल्याचा आरोप

### वन्यप्राण्यांमुळे शेती पिकांचे प्रचंड नुकसान

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 9 ) -** वन्य प्राण्यांच्या धुमाकुळाणे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे प्रचंड नुकसान झाले असून नुकसान भरपाई साठी शेतकऱ्यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या नेतृत्वात सोमवारी (दि.7) मुख्य वनसंरक्षक कार्यालयात एक तास ठिय्या देऊन नुकसान भरपाई ची मागणी केली.

नांदगाव खंडेश्वर तालुक्यात वन्य प्राणी निलगाय, जंगली जनावरे, रानटी डुक्कर व इतर जाणवरांच्या हौदसामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकरी हैराण झाला आहे.त्यात वन विभागाने पिक नुकसान भरपाईचे शेतकऱ्याचे अर्ज रिजेक्ट केले, तुटपुंजी नुकसान भरपाई शासना मार्फत देण्यात येते. त्यात वनपाल व वन परीक्षेत्र अधिकारी यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे ढवळसरी, कोठोडा, शेलू गुंड, सार्शी, माहुली चोर, लोणी टाकळी, पिंपळगाव, शिरपूर, शिलोडा, सावंगा या भागातील शेतकऱ्यांनी मुख्य वनसरक्षक कार्यालयात धडक दिली आणि नुकसान भरपाईपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी मुख्य वनसंरक्षक जोती बॅनर्जी यांचेकडे केली. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर, संतोष मानके, अनिल लेंडे वैभव सोनटक्के, प्रभाकर लोहणकर, अमोल सोनटक्के, लियाकत अली शेख इम्रान, चंद्रकांत नांदुरकर, वैभव वैद्य, पंकज भालेकर, रुपेश काळे, शिवदास नींघोट, प्रजत इंगोले, अतुल गावनेर दीपक धोंडसे, अशोक सोनोने, रुपेश राऊत व अन्य शेतकरी उपस्थित होते.



### तालुका स्तरावर व्हावे वनविभागाचे कार्यालय

वनविभाग तुटपुंजी नुकसान भरपाई देत असतांना शेतकऱ्यांना जिल्हास्तरावर चकरा माराव्या लागते. त्यामुळे तालुका स्तरावरच वनविभागाचे कार्यालय असावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. वन्य प्राण्यांच्या हैदोसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असताना वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यात समन्वय नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नाही. यांच्या समन्वयाअभावी एकमेकांच्या तक्रारीत शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. तात्काळ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा या नंतर कार्यालय सोडणार नाही, असा इशारा निवेदन सादर करून शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी दिला.

# हॉटेल, ढाब्यांवरील अवैध दारु विक्री बंद करा

## शिवसेना उबाठा पक्षाची मागणी ▪ उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि. 9 )** अचलपूर - परतवाडा शहरा लगतच्या ढाबे व हॉटेलमध्ये परवाना नसताना राजरोसपणे अवैधरीत्या दारू व इतर अंमली पदार्थांची विक्री सर्रास होत आहे. त्यातून एखादी अप्रिय घटना घडण्याची शक्यता असल्याने या हॉटेल व ढाब्यांवर कारवाई करुन तेथील अवैध दारु विक्री बंद करण्याचे मागणी शिवसेना उबाठा पक्षाने केली आहे.

यासंदर्भात पक्षाचे शहराध्यक्ष सागर वाटाने यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांनी अचलपूर उपविभागीय अधिकारी यांना एक निवेदन सादर करण्यात आले. निवेदनाच्या प्रती पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, उत्पादन शुल्क अधिक्षक अमरावती, उत्पादन शुल्क अधिकारी यांना पाठविण्यात आले आहे. ही अवैध दारु विक्री बंद करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

कोणताही परवाना नसताना या हॉटेल व ढाब्यांवर मद्यपींना बसण्याची व्यवस्था करून दारू पिण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. यामुळे जुळ्या शहरातील तरूण वर्गातील मुले व्यसनाधीन होऊन मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी मार्गाने जात आहेत. काही ठिकाणी सरकारी रोडवर अतिक्रमण करून एकापाठोपाठ एक धाबे सुरु झाले आहेत. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. तरीही लवकरच हे काळें धंदे बंद करावे, अन्यथा शिवसैनिक शिवसेना स्टाईलने आंदोलन उभारतील असा इशारा शहरप्रमुख सागर वाटाने तसेच अचलपूर विधानसभा समन्वयक अभिजित काळमेघ, उपतालुकाप्रमुख मनिष उर्फ टील्लु शर्मा, शहर प्रमुख गजानन फिसके, उपशहर प्रमुख सुधिर देशमुख, नितीन पोटे, राजा पिंजरकर, मुरलीधर पडोळे यांनी दिला आहे.

## राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन 10 मे रोजी

**अमरावती** -सर्व न्यायालयात शनिवार, दिनांक 10 मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. लोक अदालतीमध्ये दाखल व दाखलपूर्व असे प्रकरणे तडजोडीने व सामंजस्याने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत.

# हिवरखेडच्या अवधूत देवस्थानात महाप्रसाद

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि. 9 ) -** हिवरखेड शाखा क्रमांक 1 येथे असलेल्या अवधूत देवस्थानात महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी हजारो भाविकांनी उपस्थिती दर्शवून या महाप्रसादाचा लाभ घेतला. गुढीपाडवा ते रामनवमी दरम्यान उत्सव आयोजित करण्यात आला होता. त्याची सांगता या महाप्रसादाने झाली. हिवरखेड येथील नामदेवराव भोजने यांच्या जागेमध्ये अवधूत देवस्थान आहे. या देवस्थानात श्री क्षेत्र सावंगा येथून जवळपास 350 ते 400 वर्षांपूर्वी पायदळ वारी करुन पालखी मधून ज्योत आणण्यात आली होती. तेव्हापासून या मंदिरामध्ये रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. गुढिपाडव्यापासून ते रामनवमीपर्यंत चौघडा



आरती व भजन दररोज करण्यात आले. शेवटी मांडीचा वाडवा म्हणजेच महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. हा महाप्रसाद गावकऱ्यांच्या मदतीने केला जातो. उल्लेखनीय असे की, या कार्यक्रमासाठी कोणीही वर्गणी गोळा करण्यासाठी गावामध्ये फिरत नाही, तर याठिकाणी स्वत~ लोक वर्गणी घेऊन येतात. पंकज नामदेवराव भोजने यांनी सांगितले. त्यांची ही पाचवी पिढी असल्याचे ते म्हणाले.

# मोर्शी तालुक्यातील संत्रा बागायतदार अनुदानापासून वंचित

## संतप्त शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि. 9 )** 2022-23 मध्ये वादळी वा ?यासह अवकाळी पाऊस झाल्याने आणि उष्णतामान वाढल्याने मोर्शी तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्रातील संत्रा आंबिया बहार नष्ट होवून कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले होते. शासनाने पंचनामे करून शेतकऱ्याला हेक्टरी 36 हजार रुपयाप्रमाणे अनुदान घोषित केले होते. मात्र अद्यापही अनेक संत्रा बागायतदार या अनूदानापासून वंचित आहेत. तात्काळ हे अनूदान खात्यात जमा व्हावे अशी मागणी या शेतक ?यांकडून करण्यात आली असून त्यासाठी तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

शासनाने जिल्हाधिकाऱ्याकडे निधी पाठविल्यानंतर अर्धा ते एक हेक्टर जमीन असलेल्या लहान शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा झाली. परंतु मोठ्या शेतकऱ्यांचे खात्यात अद्याप अनुदान जमा झालेले नाही. तरी त्वरित अनुदानाची रक्कम संत्रा बगायतदार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनआंदोलन करण्याचा इशारा संत्रा बागातदार शेतकरी तथा मोर्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संजय तट्टे यांनी दिला आहे.

विदर्भाचा कॅलिफोर्निया समजल्या जाणाऱ्या मोर्शी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात संत्राची लागवड आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचा पावसाळ्यात येणारा मृग बहार फुटत नाही. त्यामुळे शेतकरी लाखो रुपये खर्च करून संत्रावर फवारणी करून आंबिया बहार घेतात. 2022-23 मध्ये आंबिया बहार मोठ्या प्रमाणात बहरला असताना निसर्गाच्या अवकृपेमुळे तो गळला. शेतकऱ्याचे कोट्यावधीचे नुकसान झाले.

तेव्हा शासकीय अधिकाऱ्यांनी पंचनामे करून शासनाला नुकसान झाल्याचे अहवालात कळविले. तेव्हा शासनाने शेतकऱ्यांना एका हेक्टरला 36 हजार रुपये प्रमाणे देण्याचे कबूल केले आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निधी वळताही केला. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी मोठ्या शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवले आहे. सध्या शेतकरी आर्थिक विवंचनेत असल्याने ही अनूदानाची रक्कम त्यांना अदा करुन दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# समिक्षा टाके एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 9 ) -** शहरातील रहिवासी असलेले राजुभाऊ टाके व ज्योती टाके यांची मुलगी समिक्षा टाके ही एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण झाली. नुकत्याच जाहीर झालेल्या एमबीबीएस परीक्षेच्या निकालात समिक्षाने बाजी मारल्याने तिचे आईवडील व नातेवाईसह परिचितांनी आनंद व्यक्त केला. समिक्षाने आपले प्राथमिक शिक्षण अमरावती येथे पूर्ण केल्यानंतर माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण यवतमाळ येथून पूर्ण केले. यवतमाळ येथील जीएमसी येथून आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण केली. समिक्षाने मिळविलेल्या घवघवीत यशा बद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# सहकार महर्षी स्व.शंकरराव झोबाडे याचे पुतळ्याचे मान्यवराचे हस्ते आज अनावरण

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी-** दि.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकच्या प्रवेशद्वाराचे कमानिला सहकार महर्षी स्व. शंकरराव झोबाडे द्वार याचे उदघाटन व त्यांच्या अर्धकृती पुतळ्याचे अनावरण व जिवन पटावरील गीत गायनाचे समारंभ आज दि. 10रोजी सकाळी 9 वाजता दि.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे व पुतळ्याचे अनावरन त्यांचे कर्मभुमी विहीगाव येथे आयोजित केला आहे.

स्व.शंकरराव झोबाडे यांच्या प्रवेशद्वाराला नाव व अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण सुर्जी अंजनगाव देवनाथ मठाचे मठाधीपती जितेंद्रनाथ महाराज यांचे हस्ते होणार असुन बँकेच्या प्रवेशद्वाराचे कमानिचे लोकार्पन जिल्हा म.स. बँकेचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री आ.बच्चु कडु यांच्या शुभहस्ते होणार आहे.या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थीतीत जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे,माजी खासदार नवनीत राणा, आमदार प्रकाश भारसाकडे, आ. सुलभा खोडके,आ.संजय खोडके आ.प्रविण तायडे आ.राजेश वानखडे, माजी आ.बच्चु कडु,माजी आ.नरेशचंद्र ठाकरे, आ.जगन्नाथ अभ्यंकर, आ. गजानन लवटे,माजी आ.रनजित पाटील ,माजी.आ.रमेश बुंदीले, जि.म.ब उपाध्यक्ष अभिजीत ढेपे,जि.म.ब संचालक सुधाकर भारसाकडे,संचालक अजय पा.मेहकरे सह विषेश उपस्थितीत दै.देशोन्नतीचे मुख्य संपादक प्रकाश पोहरे व जिल्ह्यातील मान्यवरांची उपस्थिती राहणार मा. शंकरराव स. झोंबाडे यांचे सहकार क्षेत्रात एक फार मोठे प्रस्थ आहे. ते अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अमरावतीचे अध्यक्ष तथा आमदार पदाचे उमेदवार होते.त्यांनी अंजनगाव किसान जिनिंग व प्रेसिंग संस्थेचे सचिव अध्यक्षपद, भूविकास बँकेचे संचालकपदा धुरा सांभाळत तालुक्याचे सहकाराचे रोपट्याचे वटवृक्षात रुपांतरण केले. अंजनगाव चे बँकेच्या शाखेची इमारत त्यांच्याच कारकिर्दीत बांधली गेली असल्याने त्यांचे नाव सहकार क्षेत्रात सदा कायम राहावे या उद्देशाने अंजनगाव येथील बँकेच्या प्रवेश द्वारावरच्या कमानीवर %सहकार महर्षी स्व. शंकरराव झोंबाडे द्वार% असे रेखांकित करण्यात येत आहे. याचे कार्यक्रमाची तयारी पूर्ण झाली असून सभासद, ठेवीदार, तालुक्यातील शेतकरी, हितचिंतकांनी प्रवेशद्वार व पुतळा अनावरण कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.शिवाजीराव श.झोंबाडे, अजय पा. मेहकरे, श्रीकांत पोटदुखे, साहेबराव हागोणे व जेष्ठ सहकारी यांनी केले आहे.



# डीबीटीमुळे निराधारांची पायपीट

## तहसिल कार्यालयात नागरिकांची गर्दी ▪ दस्तावेज देण्यासाठी भटकंती

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.9 ) -** शासनाकडून निराधार, दिव्यांग, विधवा अशा आदी नागरिकांना 1 हजार 500 रुपयांची अनुदान दिले जाते. परंतू शासनाने डिसेंबर 2024 पासून सर्व निराधार निराधार वृध्द, दिव्यांग, विधवा लाभार्थ्यांचे अनुदान डीबीटीव्दारे थेट बॅंक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे बहुतांश लाभार्थ्यांचे आधार बँक खात्याशी संलग्न नसल्याने सध्या त्यांना तहसिल कार्यालयाचे उंबरठे झिजविले लागत आहे. जिवंतपणीचा दाखल, आधार कार्ड, बॅंक पासपुक झेरॉक्स असे आदी दस्तावेज तहसिल कार्यालयात जमा करावे लागत आहे. यासाठी या लाभार्थ्यांची चांगलीच भटकंती सुरु आहे.

संजय गांधी निराधार योजना समितीच्या माध्यमातून जेष्ठ नागरिक, विधवा, परितक्ता, दिव्यांग यांना आर्थिक मदतीचा हात देत शासनाकडून दरमहिना 1 हजार 500 रुपयांचा लाभ दिला जाते. यामध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना सर्वसाधारण, संजय गांधी निराधार अनुदान योजना अनुसूचित जाती, संजय गांधी निराधार अनुदान योजना अनुसूचित जमाती, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना सर्वसाधारण, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना अनुसूचित जाती व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना अनुसूचित जमाती या लाभार्थ्यांचा समावेश आहे. अमरावती जिल्ह्यात अशा लाभार्थ्यांची संख्या 1 लाख 40 हजार 53 आहे. या पैशांतून त्यांचा उदरनिर्वाह चालतो. परंतू गेल्या तीन महिन्यापासून अनेक निराधार लाभार्थ्यांना पैसे मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी बॅंका व तहसिल कार्यालयात धाव घेतली आहे. त्यावेळी या लाभार्थ्यांना डीबीटी प्रणालीबाबत माहिती झाले. डीबीटी प्रणालीची प्रक्रिया ही तहसिल कार्यालयामार्फत सुरु असल्याने निराधार पुन्हा आपली दस्तावेज घेऊन पोहोचलेले आहे. परंतू दस्तावेज देऊनही अनेकांच्या बॅंक खात्यात पैसे जमा झालेले नाही. त्यामुळे निराधार नागरिक हे आर्थिक संकटात सापडलेले आहे.






डीबीटीद्वारे थेट लाभार्थी बॅंक खात्यात पैसे जमा केले जात आहे. अनुदान वितरीत केले जात आहे. परंतू डीबीटीसाठी लाभार्थ्यांना आपले आधार कार्ड अपडेट करून बॅंक खात्यांशी लिंक करावे लागणार आहे.

**अनिल भटकर,**
**निवासी उपजिल्हाधिकारी.**

### समस्या सोडविण्याचे पालकमंत्र्यांचे निर्देश

निराधारांसह अन्य योजनांचे लाभार्थ्यांची पायपिट होत असल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना मिळाली होती. या निराधारांच्या समस्या पाहता पालकमंत्री यांनी संबंधित गावातील तलाठी व ग्रामसेवक यांनी सुमोटो कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे. तलाठी व ग्रामसेवकांनी लाभार्थ्यांना भेटून, त्यांच्या समस्या सोडवाव्या, असे निर्देश पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी यांना दिले होते.

## जाहीर सुचना

माझे अशील मोईनोद्दीन उसमान गनी यांची खालील मिळकतीचे मुळ खरेदी खत दि. १८/०८/१९९७ र.द. क्र. २.४४६ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणास सापडली असल्या किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

या द्वारे सर्वास कळविण्यात येते की, या मिळकती बाबत वरिल दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करू नये व केल्यास माझे अशील होणाऱ्या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती ७ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढिल कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतचे वर्णन

सदर मिळकत ही म.न.पा. अमरावती व दु.नि. अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा शे.स.क्र. ६२/२, प्लॉट क्र. १२७/एबी पैकी व १२६ पैकी याचे क्षेत्रफळ १०४.७७ चौ.मि. या वर रहाते घर मौजे तारखेडा प्रगणे बडनेरा ता. अमरावती जि. अमरवती याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- सर्विस लाईन, पश्चिमेस :- रोड
उत्तरेस :- प्लॉट क्र. १२६ चा भाग दक्षिणेस :- प्लॉट क्र. १२७ चा भाग

शिक्का

**पत्ता :- ॲड. वैभव न. काकिर्डे ॲन्ड,**
**१९, हरिओम कॉलनी, संताजी नगर,**
**अमरावती ९०७३८२१००१**

